# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### उल्हासनगर (जि.ठाणे) मध्ये गुन्हेगारीचे प्रमाण वाढल्याबाबत

**(१) ८९७६ (२२-०६-२०२१) श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) शहरामध्ये हत्या, लुटमार यासारख्या गुन्हेगारीचे प्रमाण वाढत असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून हनुमान नगर, उल्हासनगर येथील परिसरात २५ ते २० जणांच्या टोळीने हातात शस्त्रे घेऊन १० पेक्षा अधिक घरांवर दरोडा व लुटमार केल्याचे दिनांक ७ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक पोलीस स्थानकात गुन्हा नोंदविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२५-१०-२०२१) :** (१), (२) व (३) उल्हासनगर पोलीस ठाणे हद्दीतील हनुमाननगर येथील परिसरात दिनांक ०७/०१/२०२१ रोजी रोहित झॉ व त्यांचे इतर साथीदार यांनी हातात शस्त्र घेवून हनुमाननगर येथील श्रीम.माया शिंदे यांच्या घराचा दरवाजा तोडून घरातील सामानाची तोडफोड करुन घरातील सोन्या, चांदीचे दागीने व रोख रक्कम ५० हजार चोरी केले. तसेच आरोपींनी परिसरातील राहणाऱ्या इतर घरातील दरवाजांवर लाथा मारुन, वीज मीटरचे नुकसान केले आहे.

ठाणे पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील परिमंडळ-४ मधील उल्हासनगर शहरामध्ये सन २०२० व २०२१ मधील जून पर्यंत तुलनात्मक हत्या व लुटमारी सारखे गुन्हे दाखल रण्यात आलेले आहेत. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे.

| वर्गवार | सन २०२० जानेवारी ते मे | | सन २०२१ जानेवारी ते मे | | फरक |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल | उघड | दखल | उघड | |
| खून | १२ | ११ | ६ | ६ | -४ |
| दरोडा | ० | ० | २ | २ | +२ |
| जबरदस्ती चोरी | २७ | १८ | २९ | १२ | +२ |

उल्हासनगर शहरात हत्या व लुटमारीबाबत उपरोक्त प्रमाणे दाखल गुन्हे पाहता सन २०२० च्या तुलनेत सन २०२१ मध्ये खुनाच्या गुन्ह्यामध्ये घट झाली असून दरोडा व जबरी चोरीच्या गुन्ह्यात वाढ दिसुन येत आहे.

श्रीमती माया अशोक शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार उल्हासनगर पोलीस ठाणेमध्ये गु.र.नं. ९/२०२१ भादवि कलम ३९५, १४१ ते १४९, ४५२, ५०४, ५०६, ४२७, १८८, २६९, २७० सह भारतीय हत्यार कायदा कलम ४, २५ नुसार एकूण नऊ जणांवर गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील तीन विधीसंघर्षीत बालके यांना ताब्यात घेऊन त्यांना बाल न्यायमंडळासमोर हजर करण्यात आलेले आहे. अटक आरोपी व विधीसंघर्षीत बालके यांच्या विरोधात सबळ पुरावे प्राप्त करुन दिनांक ०१/०४/२०२१ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मानवत (जि.हिंगोली) येथील पोलीस वसाहतीच्या दुरुस्तीच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२) ९१७४ (१३-०७-२०२१) श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानवत (जि.हिंगोली) येथील पोलीस वसाहतीच्या दुरुस्तीसाठी दिनांक १८ सप्टेंबर, २०१९ रोजी गृह विभागाने रुपये ५८ लाख ३८ हजारांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर कामाची निविदा प्रक्रिया पार पाडल्यानंतर पोलीस वसाहतीतील निवासस्थानांची डागडूजी करण्याचे काम २५% पूर्ण करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलीस वसाहतीसाठी मंजूर निधी कोरोना महामारीमुळे राज्य शासनाने इतरत्र वळविल्यामुळे काम ठप्प पडले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मानवत येथील पोलीस वसाहतीच्या दुरुस्तीच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (०६-०१-२०२२) :** (१) व (२) I. राज्यातील पोलीस दलासाठी असलेल्या जुन्या व नवीन बांधकाम केलेल्या इमारतीची देखभाल दुरुस्ती ही सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केली जाते. त्याअनुसार पत्रे बदलणे, पूर्ण प्लास्टर ही कामे प्रगतीत आहे.

II. शासन ज्ञापन, गृह विभाग क्र.दुरुस्ती-०११९/प्र.क्र.१०९/पोल-७, दिनांक १८/०९/२०१९ अन्वये मिळालेल्या प्रशासकीय मान्यतेप्रमाणे प्राप्त झालेला संपूर्ण रुपये ५८.३८ लक्ष इतका निधी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी, यांच्याकडे वर्ग करण्यात आलेला आहे.

(३) हे खरे नाही

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

## राज्यातील क्रीडा प्रबोधिनीतील खेळाडूना निधी देण्याबाबत

**(३) ९१८२ (१३-०७-२०२१) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) क्रीडा व युवक सेवा संचालनालय आणि शासनाच्यावतीने राज्यातील सर्व क्रीडा प्रबोधिनीतील खेळाडूंसाठी दरवर्षी ठराविक निधी दिला जात असून गेल्या आर्थिक वर्षातील क्रीडा प्रबोधिनीत प्रशिक्षण घेत असलेल्या खेळाडूंना निधी मिळाला नसल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मंजूर निधी क्रीडा प्रबोधिनीतील खेळाडूंना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार (२३-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

राज्यातील निवासी प्रबोधिनींमधील खेळाडूंचा भोजन, प्रशिक्षण, गणवेश, क्रीडा साहित्य, निवास इत्यादी बाबींसाठी राज्य शासनाकडून निधी देण्यात येतो. कोविड-१९ मुळे उद्भवलेल्या परिस्थितीत प्रबोधिनी बंद असल्याने यावरील खर्चासाठी निधी देण्यात आला नाही.

(२) क्रीडा प्रबोधिनीतील खेळाडूंसाठी निधी मंजूरीबाबत कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात प्रधानमंत्री किसान योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबतत

**(४) १०२५९ (०६-१०-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, अॅड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर : दिनांक - रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक मधील प्रश्न क्रमांक ७२२८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महसूल यंत्रणेच्या चुकीमुळे पंतप्रधान किसान सन्मान योजनेचे रुपये २५० कोटी अपात्र खातेदार शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अपात्र शेतकऱ्यांना वितरित झालेली रक्कम वसूल करण्याबाबतचे आदेश केंद्र शासनाने राज्य शासनाला दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महसूल विभागातील जबाबदारी असलेल्या तहसिलदार/तलाठी यांची या अनियमितेप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या योजनेचा निधी अपात्र खातेदारांना वितरित करणाऱ्या दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करुन वितरित केलेला अनुदानाची रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१३-०१-२०२२) :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) पीएम किसान योजनेंतर्गत अपात्र/ मयत व्यक्तींच्या/ चुकीच्या खात्यात जमा झालेला लाभार्थ्यांचा लाभ परत घेण्याची प्रक्रिया सुलभ व्हावी या करीता अपात्र लाभार्थ्यांकडील परतावा रक्कम त्या अपात्र लाभार्थ्यांच्या संबंधित बँकेच्या बँक खात्यातून थेट वसूल करण्यासाठी Auto Debit सुविधेचा वापर करण्यात येत आहे.

त्यानुसार केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या Standard Operating Procedure (SOP) अनुसार अपात्र व्यक्तींच्या / चुकीच्या खात्यात जमा झालेली लाभाची रक्कम वसुल करण्याची क्षेत्रियस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

दिनांक ३०/११/२०२१ अखेर आयकर भरणारे व इतर कारणांमुळे अपात्र लाभार्थी एकूण ४,६३,७८३ यांचे कडून एकूण रक्कम रुपये ३७०.२४ कोटी वसुलपात्र आहे. त्यापैकी पोर्टलवर आयकर व इतर अपात्र लाभार्थी यांची एकूण रक्कम रुपये ८६.७९ कोटी क्षेत्रियस्तरावर वसुल झालेली असून केंद्र शासनास दिनांक ३० नोव्हेंबर २०२१ अखेर एकूण रक्कम रुपये ५४.५४ कोटी परतावा जमा करण्यात आला आहे.

सदर अपात्र लाभार्थ्याकडून वसुलपात्र रक्कम वसुली करण्याकरीता राज्यस्तरावरून पाठपुरावा सुरु आहे. याकरीता आयुक्त कृषी यांचे स्तरावर सर्व जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांना १२ वेळा पत्रव्यवहार करण्यात आला आहे. तसेच यासंदर्भात वेळोवेळी दूरचित्रवाणी परिषद घेण्यात आल्या नाहीत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वरळी (मुंबई) पोलीस वसाहतीची दुरुस्ती करण्याबाबत

**(५) १०२७९ (०६-१०-२०२१) श्री.नागोराव गाणार : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ७ मधील प्रश्न क्रमांक ५१८० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वरळी पोलीस कॅम्प मधील अनेक इमारती जीर्ण झाल्याचे माहे जून, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस वसाहतीतील अनेक घरात पाणी गळणे आणि इतर कारणाने दुरुस्तीसाठी असून अनेक इमारती ५० वर्षापेक्षा जास्त जुन्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मनपा ३० वर्षे झालेल्या इमारतींच्या सर्व्हे करीत असून त्यात या इमारतींचा समावेश दुरुस्तीसाठी आहे किंवा नाही याची माहिती कॅम्प मधील पोलीस आणि कुटुंबियांना देण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, दुरवस्थेतील इमारतीमुळे हजारो पोलीस आणि कुटुंबियांना धोका निर्माण झाला असून सदरहू इमारतींची दुरुस्ती न करण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वरळी पोलीस वसाहतीची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (०६-०१-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

वरळी पोलीस कॅम्प वसाहतीतील एकूण ८७ इमारतीपैकी फक्त ०५ इमारती ५० वर्षापेक्षा जास्त जुन्या आहेत.

(३) वरळी पोलीस कॅम्प वसाहतीमधील एकुण ८७ इमारतींची देखभाल व दुरुस्ती ही शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत करण्यात येते. त्यामुळे महानगरपालीकेच्या ३० वर्षे जुन्या झालेल्या इमारतीच्या सर्वेक्षणात सदर इमारतींचा समावेश नाही.

(४) व (५) I. वरळी पोलीस कॅम्प वसाहतीमधील इमारत क्र.५, ७, १०, १२, २३, २५, २७, २९, "जी" व "जे" या दहा इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती, मजबुतीकरण व विद्युत कामाकरीता रुपये १६,१९,५३,६८२/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकीय खर्चास शासन ज्ञापन, दिनांक २२/१०/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता देऊन एकूण रुपये ३,५०,००,०००/- इतका निधी सार्वजनिक बांधकाम विभागास वितरीत केला आहे. सदर निधीमधून इमारत क्र. ५, ७, १०, १२, २३, २५, २७, २९ या आठ इमारतींच्या दुरुस्तीचे कामकाज पूर्ण झाले असून इमारत क्र."जी" व "जे" या दोन इमारतींचे दुरुस्तीचे कामकाज अंतिम टप्यात आहे.

II. वरळी पोलीस कॅम्प वसाहतीमधील इमारत क्र.१ ते ४, ६, ८, ९, ११, १३ ते २२, २४, २६, २८, ३० ते ५४, "ए", "बी", "सी", "एफ" व "एच" या ५१ इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती व मजबुतीकरण करण्यासाठी रुपये ९२,८६,८०,८०९/- (रुपये ब्याण्णव कोटी शहाऐंशी लाख ऐंशी हजार आठशे नऊ फक्त) इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास शासन ज्ञापन दिनांक १५/०२/२०२१ अन्वये शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच दुरुस्तीसाठी रुपये २.५ कोटी इतका निधी सार्वजनिक बांधकाम विभागास उपलब्ध करुन दिला आहे. याव्यतिरिक्त इतर १८ इमारती जीर्ण झाल्याने रिक्त करण्यात आलेल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे, सोलापूर आणि रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांची शुन्य हर्बल ॲग्रो डेव्हलपमेंट प्रा.लि. या कंपनीने आर्थिक फसवणूक केल्याबाबत

**(६) १११९६ (२३-११-२०२१) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे, सोलापूर आणि रायगड जिल्ह्यातील ५०० पेक्षा अधिक शेतकऱ्यांची शुन्य हर्बल ॲग्रो डेव्हलपमेंट प्रा.लि. या कंपनीने रुपये २३ कोटी ४५ लाखांचा आर्थिक फसवणूक केली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शुन्य हर्बल ॲग्रो डेव्हलपमेंट प्रा.लि. या कंपनीने शेतकऱ्यांना शतावरी व अश्वगंधा या औषधी वनस्पतींची शेती लागवड केल्यानंतर येणारे पीक एकरी रुपये ३ लाख मोबदला देवून विकत घेण्याचे आमिष दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे, सोलापूर आणि रायगड सह अन्य जिल्ह्यातील किती शेतकऱ्यांच्या माल सदर कंपनीने काढून नेला, शेतकऱ्यांच्या शेतातील काढून नेलेल्या मालाचा किती शेतकऱ्यांना मोबदला अदा करण्यात आला आहे, सदर कंपनीकडून शेतकऱ्यांना मालाचा परतावा किती कालावधीत अदा करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या कंपनीवर कारवाई करुन शेतकऱ्यांना शेतमालाचा परतावा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (१४-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

श्री.अमीर बशीर सय्यद, मौजे-मळद, ता.दौंड, जि.पुणे या शेतकऱ्याने तालुका कृषी अधिकारी, दौंड, जि.पुणे यांच्याकडे दिनांक ०२/१२/२०२१ रोजी तक्रार दाखल केली आहे.

(२) नाही.

शेतकरी व शुन्य हर्बल ॲग्रो डेव्हलपमेंट प्रा.लि. यांच्यामध्ये झालेल्या करारामध्ये शेतकऱ्यांना शतावरी व अश्वगंधा या औषधी वनस्पतीची लागवड केल्यानंतर येणारे पीक एकरी रुपये ३.०० लाख मोबदला देऊन विकत घेण्याबाबतची नोंद नमूद नाही. तथापि, शतावरीच्या वार्षिक मुळ्या प्रति झाड ६ किलो व ६ मेट्रीक टन उत्पादन करण्याची हमी लिहून देणार कंपनीने घेतली असल्याचे तसेच शतावरीच्या ओल्या मुळ्या रुपये ५०/- प्रति किलो व दिलेल्या मार्गदर्शनानुसार सुर्यप्रकाशात किमान २० दिवस सुकवलेल्या मुळ्या रुपये २५०/- किलोप्रमाणे कंपनी खरेदी करेल असे नमूद आहे.

(३) शतावरी औषधी वनस्पती लावण्यासंदर्भात संबंधित शेतकरी व शुन्य हर्बल ॲग्रो डेव्हलपमेंट प्रा.लि. या कंपनीमध्ये कृषी विभागास अवगत न करता परस्पर करारनामा करण्यात आला. तसेच करारनाम्यामध्ये नमूद केल्यानुसार औषधी वनस्पती लागवडीची नोंद राज्य शासनाच्या दत्परी करण्यात आली नाही. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांचा माल काढून नेल्यानंतर कंपनीने किती शेतकऱ्यांना मोबदला अदा केला नाही तसेच तो किती कालावधीत अदा करण्यात येणार आहे याची निश्चित माहिती विभागाकडे नाही.

(४) कंपनीने काढून नेलेल्या मालाचा मोबदला अदा न केल्याची तक्रार विभागाकडे दिनांक ०२/१२/२०२१ रोजी प्राप्त झाली. तथापि, यासंदर्भात राहूल विजय शहा यांनी यापूर्वीच पोलीस ठाणें, सहकार नगर, पणु शहर येथे प्रथम खबर क्रमांक ०२३८, दिनांक १५/०९/२०२१ रोजी दाखल केली असून त्याअनुषंगाने कार्यवाही सुरु असल्यामुळे विभागामार्फत स्वतंत्रपणे चौकशी करण्यात आली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील लहान मुले आणि महिलांची तस्करी रोखण्याबाबत

**(७) ११४४२ (२५-११-२०२१) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय गुन्हे नोंदणी शाखेने प्रकाशित केलेल्या अहवालानुसार राज्यातील लहान मुले आणि महिलांच्या तस्कराची ५५१ प्रकरणे निदर्शनास आली असून ५४१ अल्पवयीन मुली व महिलांचे लैगिंक शोषण झाल्याची माहिती निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मानवी तस्करीचे प्रमाण मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर व औरंगाबाद या शहरात नोंदविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, कुंटणखान्यापासून सुरु झालेले लैगिंक जाळे (रॅकेट) बॉलीवूड पर्यंत पसरल्याचे तसेच या कामासाठी राज्यात मोठी टोळी कार्यरत असल्याचे पोलीसाच्या कारवाईतून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील लहान मुले आणि महिलांची तस्करी रोखण्याचे दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१७-१२-२०२१)** : (१) होय, सन २०२० मध्ये महाराष्ट्रामध्ये ५५७ बळीतांची सुटका करण्यात आली असून त्यामध्ये ५५१ महिला व ६ पुरूषांचा समावेश आहे.
(२) सन २०२० मध्ये दाखल गुन्ह्यांची संख्या पुढीलप्रमाणे आहे-
क) मुंबई शहर-७० गुन्हे.
ख) ठाणे शहर-१३ गुन्हे.
ग) पुणे शहर- १४ गुन्हे.
घ) नागपूर शहर-१३ गुन्हे.
ड) औरंगाबाद शहर-०१ गुन्हा.
(३) लैंगिक जाळे (रॅकेट) बॉलीवूड संबंधात सन २०१९ मध्ये १ गुन्हा दाखल असून यामध्ये २१ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यामध्ये मा.न्यायालयात दोषारोप दाखल करण्यात आले आहेत. सन २०२० मध्ये याबाबतचा गुन्हा नोंद नाही.
(४) लहान मुले आणि महिलांची तस्करी रोखण्याकरीता मुस्कान पथक, भरोसा पथक, दामिनी पथक, महिला सहायता कक्ष, इ. पथके स्थापन करण्यात आली आहेत. तसेच, दिनांक २५/०८/२०२१ रोजीच्या शासन

निर्णयान्वये राज्यामध्ये ४५ अनैतिक मानवी वाहतूक कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. दिनांक १०/११/२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये १८ वर्षाखालील हरविलेल्या मुलांच्या बाबतीत संबंधीतांच्या कायदेशिर पालकांकडून प्राप्त तक्रारीची नोंद हरविलेल्या व्यक्तींच्या नोंदवहीत नोंद न घेता अशा प्रकरणी थेट अपहरणाचा गुन्हा दाखल करण्याच्या सूचना सर्व पोलीस घटकांना देण्यात आलेल्या आहेत. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध संबंधात भा.द.वि., कलम ३७०, ३७०(क) ही कलमे लावणेबाबत व अनैतिक मानवी वाहतूक संबंधातील गुन्हे करणाऱ्या इसमाविरुध्द प्रतिबंधात्मक कारवाई करणेबाबत दिनांक ३०/०१/२०२० रोजीच्या परिपत्राकान्वये सर्व पोलीस घटकांतर्गत सर्व तपासी अधिकारी, सर्व संबंधितांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध अधिनियम, १९५६ व भारतीय दंड विधान संहिता यांमधील तरतुदींच्या प्रभावी अंमलबजावणी बाबत सर्व पोलीस घटकांना दिनांक ०९/०२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये सूचित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पाचेगाव (ता.गेवराई, जि.बीड) येथील अत्याचारग्रस्त महिलेस हद्दपार केल्याबाबत

**(८) ११४४६ (२५-११-२०२१) श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाचेगाव (ता.गेवराई, जि.बीड) येथील महिलेवर सन २०१५ मध्ये गावातील चार जणांनी सामुहिक अत्याचार केला असून आरोपींना माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान जन्मठेपेची शिक्षा झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू पिडीत महिलेच्या पतीची लॉकडाऊन मध्ये नोकरी गेल्याने पिडीत महिला पाचेगाव येथे वास्तव्यास आली असता पाचेगावसह वसंतनगर तांडा, जयरामनाईक तांडा या तीन ग्रामपंचायतीने दिनांक १५/०८/२०२० रोजी ठराव करुन पिडीत महिलेला गावातून हद्दपार केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी गटविकास अधिकारी यांनी केलेल्या चौकशीनुसार हद्दपारीचा ठराव झाला नसल्याचे निदर्शनास आले असून याबाबत राष्ट्रीय महिला आयोगाने दखल घेवूनही शासनाने पुढील कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीच्या अनुषंगाने पिडीत महिलेला जाणिवपूर्वक त्रास देणाऱ्या सरपंच व शासकीय यंत्रणेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१७-१२-२०२१)** : (१) गेवराई पोलीस स्टेशन, जि.बीड येथे पिडीत महिलेच्या तक्रारीवरून गु.र.क्र. ०२/२०१५, भा.दं.वि., कलम ३६३, ४५२, ३५४, ३७६(ड), ३२३, ५०४, ५०६ अन्वये ४ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता.सदर प्रकरणी मा.सत्र न्यायालय, बीड यांनी दिनांक २२/१०/२०२० रोजी ४ ही आरोपींना जन्मठेप व प्रत्येकी रुपये ५०००/- चा दंड ठोठावला आहे.
(२) सदर पिडीत महिलेचे मूळ गाव पाचेगांव, ता.गेवराई, जि.बीड हे आहे. सदर महिला पाचेगांव येथे पुर्वीपासून वास्तव्यास आहे. तसेच, बीड येथे देखील राहत आहे. मौजे पाचेगांव, वसंतनगर तांडा, जयराम नाईक तांडा या ३ ग्रामपंचायतींच्या अभिलेखावरून महिलेस हद्दपार केल्याबाबतची नोंद दिसून येत नाही.
(३) महिलेस ग्रामपंचायत कार्यालय, पाचेगांव, वसंतनगर तांडा, जयराम तांडा या तिन्ही ग्रामपंचायतींनी गावातून हद्दपार करण्याचा निर्णय घेतल्याचे प्रसार माध्यमामध्ये प्रसारित झाले होते. परंतु, मौजे पाचेगांव, वसंतनगर तांडा, जयराम नाईक तांडा या ३ ग्रामपंचायतींच्या अभिलेखावरून महिलेस हद्दपार केल्याबाबतची नोंद दिसून येत नाही.
(४) पोलीस स्टेशन, गेवराई येथे पिडित महिलेच्या तक्रारीवरून जीवे मारण्याची धमकी दिल्याबाबत आरोपीविरुध्द भा.दं.वि., कलम ५०६, ५०४ अन्वये दिनांक २६/१२/२०२० रोजी अदखलपात्र गुन्हा क्र. १०६६/२०२० दाखल करण्यात आला असून, सदर आरोपी विरूध्द प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे.

महिलेस ग्रामपंचायत कार्यालय, पाचेगांव, वसंतनगर तांडा, जयराम तांडा या तिन्ही ग्रामपंचायतींनी गावातून हद्दपार करण्याचा निर्णय घेतल्याचे प्रसार माध्यमामध्ये प्रसारित झाले होते. त्यामुळे, सदरील ३ गावामध्ये ताणतणावाचे वातावरण निर्माण होऊ नये, याकरीता दिनांक २७/१२/२०२० रोजी पासून पोलीस गार्ड नेमण्यात आला होता.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील वाळूमाफियांवर कारवाई करण्याबाबत

**(९) ११४५८ (२५-११-२०२१) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील मर्डे डांगमोडे येथे गडनदी खाडी पात्रात व कालावल खाडी पात्रात संक्शन पंपाद्वारे मागील २ वर्षापासून अवैधरित्या वाळू उपसा व वाहतूक सुरु असल्यामुळे येथील ग्रामस्थांना समस्यांना सामोरे जावे लागत असून अवैध वाळू उपसामुळे शासनाचे कोटयवधी रुपयांचा महसूल बुडत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अवैध वाळू उपसा व वाहतूक प्रकरणी येथील नागरिकांनी जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग तसेच अन्य संबंधित अधिकाऱ्याकडे तक्रारी करुनही वाळू माफियांविरोधात कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वाळू माफियांवर तसेच त्यांना सहकार्य करणाऱ्या प्रशासनातील दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (०७-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) मौजे मर्डे डांगमोडे या गावात अवैधरित्या वाळू उपसा सुरु असल्याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या चौकशीमध्ये उक्त ठिकाणी वाळू उत्खनन होत नसल्याचे आढळून आले आहे.

सिंधुदूर्ग जिल्हयात अनधिकृत वाळू उपसा रोखणेकामी जिल्हास्तरावर/ उपविभागीय स्तरावर तसेच तालुकास्तरावर नियुक्त करण्यात आलेल्या दक्षता पथकांमार्फत वेळोवेळी कडक मोहिम राबविण्यात येते. त्यानुसार सिंधुदूर्ग जिल्हयात दिनांक ०१/०४/२०२१ ते दिनांक ३०/१०/२०२१ या कालावधीत गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ७७ प्रकरणी दंडात्मक कार्यवाही करुन रुपये ७६.५३ लाख इतकी रक्कम शासनजमा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## डोंबिवलीतील (जि.ठाणे) मानपाडा पोलीस स्टेशनचे त्रिभाजन करण्याबाबत

**(१०) ११५४३ (२५-११-२०२१) श्री.प्रसाद लाड** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवलीतील (जि.ठाणे) मानपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत नागरिकीकरण वाढल्याने मानपाडा पोलीस ठाण्याचे त्रिभाजन करुन काटई व दावडी अशी दोन नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्याची मागणी स्थानिक नागरिक व कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रतिनिधी यांनी मा.गृहमंत्री यांचेकडे दिनांक १६ जून, २०२१ रोजी लेखी निवेदनाद्‌वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, मानपाडा पोलीस स्टेशनचे त्रिभाजन करुन आणखी दोन नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्याचा सविस्तर प्रस्ताव ठाणे पोलीस आयुक्तालयामार्फत शासनाकडे सुमारे ३ वर्षापूर्वी सादर करण्यात येवूनही याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मानपाडा पोलीस स्टेशनचे त्रिभाजन करुन नवीन दोन पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१५-१२-२०२१) :** (१) होय.
(२) व (३) मानपाडा पोलीस ठाण्याचे विभाजन करून काटई व दावडी अशी दोन नवीन पोलीस ठाणे निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव अद्‌याप शासनास प्राप्त झालेला नाही. तथापि, या संदर्भात पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य व पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांच्याकडून शासन पत्र दिनांक १३/०७/२०२१ व्दारे अहवाल मागविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शहापूर (जि.ठाणे) पोलीस ठाण्याकरीता सुसज्ज नवीन इमारत बांधण्याबाबत

**(११) ११५६० (२५-११-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) किन्हवली (ता.शहापूर, जि.ठाणे) गावातील कायदा व सुव्यवस्था सांभाळण्यासाठी कार्यरत असलेल्या शहापूर पोलीस ठाण्याचा कारभार पडक्या कौलारु खोल्यामध्ये सुरु असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहापूर पोलीस ठाण्याच्या खोल्यांना पावसाळयात पाणी गळती होत असल्याने प्लास्टिकचा आधार घ्यावा लागत असून पोलीस ठाण्यात विविध सोयी-सुविधांचा अभाव असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शहापूर पोलीस ठाण्याकरीता सुसज्ज इमारत बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१५-१२-२०२१) :** (१) व (२) पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांच्या अधिपत्याखालील किन्हवली पोलीस ठाणे व शहापूर पोलीस ठाणे ही स्वतंत्र पोलीस ठाणे आहेत. शहापूर पोलीस ठाणे इमारत ही १४५ वर्षे जुनी असून इमारतीचे बांधकाम दगडी चुन्याचे असून मंगलोरी कौलारु चाळ

पध्दतीचे आहे. सदर इमारतीमध्ये शहापूर पोलीस ठाणे, तहसिल कार्यालय, कोषागार कार्यालय ही एकत्रित कार्यालये आहेत. शहापूर मध्ये पावसाळयात मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो. त्यामुळे पावसाच्या पाण्याची कौलामधून गळती होऊ नये, म्हणून पावसाळ्यापूर्वी सार्वजनिक बांधकाम, शहापूर विभागामार्फत प्लास्टिक ताडपत्री आच्छादित करण्यात येत असते. तसेच सदर इमारत वापरणे योग्य असून आवश्यक सर्व सोयी सुविधा उपलब्ध आहेत.

(३) शहापूर पोलीस ठाणेची इमारत बांधकाम करणेबाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांनी प्राधान्यक्रम निश्चित करुन पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ यांना कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ग्रामीण पोलीस स्टेशन बीड येथील पोलीस निरीक्षक व उपनिरीक्षक यांच्यावर कारवाई करण्याबाबत

**(१२) ११५९० (२५-११-२०२१) श्री.विनायकराव मेटे** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रा.कझनी (ता.जि.बीड) येथील राजकीय पक्षाचे तालुका युवक अध्यक्ष व माजी सरपंच यांचेवर प्राणघातक हल्ला झाल्याचे दिनांक ४ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी ग्रामीण पोलीस स्टेशन बीड येथील पोलीस निरीक्षक संतोष साबळे व पोलीस उपनिरीक्षक पवनकुमार राजपूत यांनी आरोपींना अभय व फरार होण्याची संधी मिळण्याच्या हेतूने आरोपींवर गुन्हा दाखल करण्यास जाणीवपूर्वक उशीर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्राणघातक हल्ल्याच्या गुन्ह्यांसंबंधी पोलीस निरीक्षकाकडे विचारणा केली असता पोलीस निरीक्षकांनी लोकप्रतिनिधींशी असभ्य भाषेत बोलून त्यांचा अवमान केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ग्रामीण पोलीस स्टेशन बीड येथील पोलीस निरीक्षक व उपनिरीक्षक यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१६-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) राजकीय पक्षाचे तालुका युवक अध्यक्ष व माजी सरपंच यांच्यावर प्राणघातक हल्ला झाल्याची घटना दिनांक ०४/०७/२०२१ रोजी रात्री उशिरा घडली असून त्याबाबत पोलीस ठाणे बीड ग्रामीण येथे दिनांक ०५/०७/२०२१ रोजी गु.र.नं.१७१/२०२१ भा.दं.वि. कलम ३०७, ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ सह, भा.ह.का. कलम ४/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असून जाणीवपूर्वक उशिर केल्याचे आढळून आलेले नाही.
(३) याबाबत उप विभागीय पोलीस अधिकारी, बीड यांच्याकडून चौकशी सुरु असून याबाबत पुरावे प्राप्त झाल्यास नियमानुसार पुढील कारवाई करण्यात येणार आहे.
(४) याबाबत उप विभागीय पोलीस अधिकारी, बीड यांच्याकडून चौकशी सुरु असून चौकशीअंती पुढील कारवाई करण्यात येईल.
(५) विलंब झालेला नाही.

---

## नवेगाव बुज (करडी) (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथे रोहयोंतर्गत कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१३) ११६१४ (२३-११-२०२१) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवेगाव बुज (करडी) (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथे रोहयोंतर्गत माहे मे-जून, २०२१ मध्ये नाला सरळीकरणाचे करण्यात आलेले काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विभागीय अधिकारी यांनी सदर कामांमध्ये मजूरांचे मस्टर भरुन त्यांचेशी संगनमत करुन मजूरांना देण्यात आलेल्या रकमेपैकी आर्धी रक्कम परत घेवून गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची तक्रार मोहाडी येथील राजकीय पक्षाने विभागीय आयुक्त रोहयो, नागपूर, प्रधान सचिव, रोहयो व नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई, रोहयो तक्रार निवारण अधिकारी रोहयो भंडारा, खंड विकास अधिकारी, मोहाडी, सरपंच व ग्रामसेवक ग्रामपंचायत नवेगाव बुज यांचेकडे केली असून दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निकृष्ट्र दर्जाचे काम व गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (१५-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) सदर प्रकरणी चौकशीअंती सदर कामांमध्ये दोष निदर्शनास आलेले नाहीत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील नायगाव पोलीस मुख्यालय वसाहतीचे नुतनीकरण/ पुनर्बांधणी करण्याबाबत

**(१४) ११६५४ (२५-११-२०२१) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील नायगाव पोलीस मुख्यालयाच्या जीर्ण व मोडकळीस आलेल्या धोकादायक ९ इमारतीत ९७१ पोलीस कर्मचारी आपल्या कुटुंबियांसह वास्तव्य करीत असल्याचे दिनांक ८ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नायगाव पोलीस मुख्यालय वसाहतीचे नुतनीकरण/पुनर्बांधणी करण्याबाबत तसेच या वसाहतीत सन २०१० पर्यंत वास्तव्य करणाऱ्या पोलीस बांधवांना हक्काचे घर देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (०७-१२-२०२१)** : (१) नायगाव पोलीस मुख्यालय इमारत क्र.१ ते ९ मध्ये ७५६ पोलीस कर्मचारी आपल्या कुटुंबियासह वास्तव्य करीत असून इमारतीचे संरचनात्मक परिक्षक सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे मे.केबीपी सिव्हिल इंजिनअरिंग सर्व्हिसेस यांनी दिनांक ०३/१०/२०२० रोजी केले आहे. सदर अहवालामध्ये नमूद इमारती रहाण्यास योग्य नसल्याचे नमूद केले आहे.

(२) नायगाव पोलीस मुख्यालय इमारत क्र.१ ते ९ इमारतीच्या दुरुस्ती कामांकरीता वित्तीय वर्ष २०१७-१८ ते २०१९-२० या कालावधीत सार्वजनिक बांधकाम विभागास रुपये ३,९९,३८,३६५/- इतका निधी वितरित केला आहे. सदर इमारतींचा पुनर्विकास महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, वरळी मुंबई यांचेमार्फत करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## थेरोंडा (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील मच्छिमार बांधवांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(१५) ११६७५ (२३-११-२०२१) श्री.रमेशदादा पाटील** : सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) थेरोंडा (ता.अलिबाग, जि.रायगड) मच्छीमार विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि. थेरोंडा या संस्थेच्या सभासद मच्छीमार बांधवांना क्यार व महाचक्रीवादळामुळे संपूर्ण क्षमतेने मासेमारी करता आलेली नसल्यामुळे त्यांना आर्थिक सहाय्य मंजूर करण्याबाबतचे निवेदन मच्छिमार बांधवांनी आयुक्त, मत्स्यव्यवसाय विकास विभाग यांना माहे ऑक्टोबर, २०२१ च्या पहिल्या आठवड्यात दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यातील काही नौकांनी प्रमाणपत्र करीता सन २०१५ ते २०१९ मध्ये परवाना अधिकारी, अलिबाग यांच्या कार्यालयाकडे प्रस्ताव सादर केले होते, मात्र तत्कालीन परवाना अधिकारी, अलिबाग यांच्याकडून या प्रस्तावाची नोंद झाली नसल्याने नौका मालकांना चक्रीवादळाच्या प्रस्तावातून वगळण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त नौका मालकांनी चक्रीवादळामुळे झालेल्या आर्थिक नुकसानाचे अर्थसहाय्य मंजूर करण्याबाबत शासनाकडे विनंती अर्ज केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन थेरोंडा येथील मच्छिमार बांधवांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (१५-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

विशेष आर्थिक सहाय्य मच्छिमार नौका मालकास वाटप करण्याच्या अनुषंगाने शासन निर्णय दिनांक ०९ सप्टेंबर, २०२० मधील नमूद पात्रतेचे सर्व निकष पूर्ण करणाऱ्या लाभार्थ्यांना अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) मच्छिमार लाभार्थी नौकामालक शासन निर्णय दिनांक ०९ सप्टेंबर, २०२० मधील अट क्र. ५ व ७ अन्वये अर्थसहाय्य देण्यात येणाऱ्या कालावधीमध्ये नौकेची रिअल क्राफ्ट प्रणालीतर्गत नोंदणी झालेली असणे तसेच सदर कालावधीचा नौकेंचा विधिग्राहृय मासेमारी परवाना असणे आवश्यक आहे. ज्या नौका मालकामार्फत सदर अटीची पूर्तता करण्यात आलेली आहे त्या नौकामालकांना अनुदान मंजूर करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

# मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील विरार ते दहिसर टोल नाका दरम्यानच्या हद्दीतील रस्ते अपघात रोखण्याबाबत

**(१६) ११६८० (२५-११-२०२१) श्री.विलास पोतनीस** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) पूर्वेतील मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील विरार ते दहिसर टोल नाका दरम्यानच्या चिंचोटी महामार्ग पोलिसांच्या हद्दीत माहे जानेवारी ते सप्टेंबर २०२१ या नऊ महिन्यांच्या कालावधीमध्ये ९६ अपघातांची नोंद झाली असून या अपघातांत ६४ जण जखमी तर ९ जणांचा मृत्यू झाल्याचे दिनांक २ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रस्ते अपघात रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१६-१२-२०२१)** : (१) व (२) वसई (जि.पालघर) पूर्वेतील मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील विरार ते दहिसर टोल नाका दरम्यानच्या चिंचोटी महामार्ग पोलिसांच्या हद्दीत माहे जानेवारी ते सप्टेंबर २०२१ या नऊ महिन्यांच्या कालावधीमध्ये १३३ अपघातांची नोंद झाली असून या अपघातात एकूण ८० जखमी व ७३ जणांचा मृत्यू झाला आहे.

मोटार अपघातामध्ये गुन्ह्यांच्या तपासाअंती दोषी वाहनचालक यांचेवर गुन्हे दोषारोप दाखल करून कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

तसेच अपघात रोखण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

- रस्ता सुरक्षा समितीची बैठक घेऊन ब्लॅक स्पॉटची माहिती संकलित करणे, त्यावर उपाययोजना सुचविणे, अपघात घटनास्थळाची पाहणी करून अपघातांच्या कारणांची समिक्षा करणे, वाहतूक नियम न पाळणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई करणे, इत्यादी बाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

- अपघात टाळण्याकरीता खड्डे दुरूस्ती, रोड दुभाजक/ कट आऊट बंद करणे, स्पिड ब्रेकर रॅप्लर लावणे, पादचारी पुलाची व्यवस्था, रस्त्यावर रिफ्लेक्टर लाईट बसविणे, सी.सी.टी.व्ही. बसविणे, निर्जनस्थळी लाईट बसविणे, इत्यादी व्यवस्था करणेकरीता व्यवस्थापक, नॅशनल हायवे अथॉरिटी ऑफ इंडिया यांना कळविण्यात आले आहे.
- तसेच अपघातामध्ये दरवर्षी १० टक्क्यांनी घट होण्याकरीता विशेष प्रयत्न करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## यवतमाळ जिल्ह्यात वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात विद्यार्थ्याची हत्या झाल्याबाबत

**(१७) ११६८५ (२५-११-२०२१) श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.मोहनराव कदम, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएसच्या तृतीय वर्षाला शिकत असलेला विद्यार्थी अमोल पाल, रा.ठाणे याची निर्घृण हत्या करण्यात आल्याचे दिनांक ११ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू घटनेनंतर वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या आवारातील सुरक्षेबाबत प्रश्न निर्माण झाला असून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसह परीविक्षाधीन डॉक्टर्स, निवासी विद्यार्थी यांनी ठिय्या आंदोलन करुन आरोपीस अटक करण्याची मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आरोपीला पकडून त्याचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१५-१२-२०२१) :** (१) दिनांक ११ नोव्हेंबर, २०२१ रोजी यवतमाळ जिल्ह्यातील वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएसच्या तृतीय वर्षाला शिकत असलेला विद्यार्थी अशोक सुरेंद्र पाल, ठाणे याच्या हत्त्या प्रकरणी पोलीस स्टेशन यवतमाळ शहर येथे गु.र.नं. ८२४/२१ कलम ३०२, ३४ भा.दं.वि. सह कलम ४,२५ आर्म अॅक्टचा गुन्हा नोंद आहे.

(२) सदरहू घटनेनंतर वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे दार बंद करुन महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी व विद्यार्थीनी यांनी दिवंगत श्री.पाल याच्या हत्त्या प्रकरणी आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी याकरीता ठिय्या आंदोलन केले. तथापि, सदर गुन्हयातील आरोपींना अटक झाल्याने व रुग्णालयाच्या सुरक्षेबाबत मागण्या मान्य झाल्याने दिनांक १४/११/२०२१ रोजी ठिय्या आंदोलन मागे घेण्यात आले.

(३) उपरोक्त प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून एकूण ५ आरोपींना अटक करण्यात आली असून आरोपींनी वापरलेले धारदार चाकू, मोबाईल, वाहन जप्त करण्यात आले आहे. गुन्हयातील ४ आरोपी न्यायालयीन कोठडीत असून १ विधिसंघर्षग्रस्त बालकास बालन्यायमंडळ समोर हजर करण्यात आले. गुन्हयाचा तपास सुरु असून तपासाअंती आरोपींविरुध्द दोषारोपपत्र वि. न्यायालयात सादर केले जाणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौ.तोडोली (ता.पैठण, जि.औरंगाबाद) येथील शेतवस्तीवर दरोडेखोरांनी दरोडा टाकून महिलांवर अत्याचार केल्याबाबत

**(१८) ११६९५ (२५-११-२०२१) श्री.संजय दौंड :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तोडोली शिवारातील (ता.पैठण, जि.औरंगाबाद) शेतवस्तीत शेतकामासाठी वास्तव्यास असलेल्या कुटुंबियांवर दिनांक १९ ऑक्टोबर, २०२१ रोजी ७ सशस्त्र दरोडेखोरांनी दगडफेक करुन तेथील पुरुषांना शस्त्राचा धाक दाखवुन व

त्यांचे हातपाय बांधून त्यांचेकडील रोख रक्कम, सोन्याचे दागिने व दुचाकी वाहन लुटल्याचे तसेच वस्तीवरील दोन महिलांवर सामुहिक अत्याचार केल्याची घटना माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी बिडकीन पोलीस ठाण्यात दिनांक २० ऑक्टोबर, २०२१ रोजी दरोडा व बलात्काराची तक्रार नोंदवूनही अद्याप गुन्हेगारांना पकडण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दरोडेखोर आरोपींवर कारवाई करुन बाधित शेतकामागारांना त्याचे ऐवज परत मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१६-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन बिडकीन, ता.पैठण येथे गु.र.नं. ३७०/२०२१ भा.दं.वि. कलम ३७६(ड), ३९५, ३९७, ४५८, १२०(ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ चे कलम ३(१)(ii), ३(२), ३(४) या शिवाय कलम २३(१)(a) अन्वये कारवाई सुरु आहे.

(२) सदर गुन्ह्यात एकूण ०७ आरोपी निष्पन्न झाले असून सर्व आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. सध्या सर्व आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत.

(३) सदर गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्यात आली असून तपासादरम्यान गुन्ह्यातील मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यासंदर्भात मा.न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कारवाई करण्यात येत आहे.

(४) विलंब झालेला नाही.

## धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २११ करीता भूसंपादनात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१९) ११६९६ (०६-१२-२०२१) श्री.संजय दौंड, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २११ करीता बीड-जालना-औरंगाबाद जिल्ह्यातील बायपास रस्त्याकरीता मौ.धोत्रा, मौ.चौसाळा, मौ.समनापूर, गेवराई व शिंदोड गावातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादीत केल्या असून सदरहू जमिनीचा मोबदला देताना हायवेपासून दूर अंतरावर असणाऱ्या जमिनीचा दर प्रति चौरस मीटर रुपये १३७ ते रुपये २१६ इतका देणे अपेक्षित असताना शेतकऱ्यांशी संगणमत करुन उपरोक्त जमिनी हायवेलगत असल्याचे दाखवून बीड बायपाससाठी शासनाचे नियम डावलून शेतकऱ्यांना बेकायदेशीररित्या मावेजा रुपये २१०० इतका दर देऊन केंद्र व राज्य शासनाची रुपये १०० कोटींची फसवणूक केल्याचे दिनांक ५ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आर्थिक गैरव्यवहारत बीड जिल्हा भूसंपादन अधिकारी, तहसिलदार,बीड, भुमी अभिलेख, नगररचनाकार व जिल्हा भूसंपादन विभागातील सबंधित सर्व अधिकारी यांचा समावेश असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जमीन मोबदला (मावेजा) वाटप गैरव्यवहार प्रकरणी जिल्हाधिकारी, बीड यांनी कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग औरंगाबाद यांना चौकशी करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशानुसार उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (१६-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही. धुळे, सोलापूर राष्ट्रीय महामार्ग क्र.२११ करीता उपविभागीय अधिकारी बीड व उपजिल्हाधिकारी भूसंपादन जायकवाडी प्रकल्प बीड या दोन कार्यालया अंतर्गत जमीन भूसंपादनाचे काम झालेले असून खालीलप्रमाणे मोबदला देण्यात आलेला आहेत.

मौजे गेवराई ग्रामीण ता.जि.बीड सर्वे क्र.२४३, ५६१ मधील महामार्गावरील क्षेत्रास रुपये ८००/- प्र.चौ.मी. (रुपये ८०,००,०००/- प्र.हे.) असा दर देण्यात आलेला आहे. मौजे चौसाळा ता.जि.बीड येथील सर्वे नं.५३ मधील, चौसाळा-नांदूर राज्यमार्ग या जमिनीस रुपये ९००/- प्र.चौ.मी. असा दर देण्यात आलेला आहे. मौजे धोत्रा ता.जि.बीड येथील ग.नं/स.नं.१४०,१४५ ते १४८ या हायवे वरील जमिनीस रुपये ७६०/- असा दर देण्यात आलेला आहे. मौजे समनापूर ता.जि.बीड येथील गट नं.११४ व ११६ या जमिनीस रुपये २४५/- असा दर देण्यात आलेला आहे. मौजे शिदोड ता.जि.बीड येथील गट नं.१०५, १०८, १०९, ११७, ११८, ११९, १२२, १२३ व १९८ या हायवे अंतर्गत जमिनीस रुपये ६९७/- असा दर देण्यात आलेला आहे.

निवाड्यामध्ये दिलेला दर शिघ्रसिध्द गणकामधील कोष्टकाप्रमाणे देय केलेला आहे. भूसंपादन अधिनियम २०१३ च्या कायद्यामधील कलम २६ ते ३० प्रमाणे अंतिम निवाडे मंजूर करण्यात आलेले आहेत. प्रकल्प संचालक (राष्ट्रीय महामार्ग) यांचे मंजुरीनंतर मावेजा वाटप केलेला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना रेशीम तुती लागवडीच्या लाभाची प्रतिपूर्तीची रक्कम देण्याबाबत

**(२०) ११६९८ (०६-१२-२०२१) श्री.संजय दौंड :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी रेशीम तुती योजनेंतर्गत रेशीम तुतीची लागवड करुन त्याचा संपूर्ण खर्च शेतकऱ्यांनी करुनही त्याची प्रतिपूर्ती शासनाने केली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी शासनाकडे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रेशीम तुती लागवड शेतीच्या मशागतीसाठी ६ मजुरांना परवानगी असून त्याची मजुरी रुपये ५२,०८० तसेच त्यासाठी उभाराव्या लागणाऱ्या शेडचे कामासाठी रुपये ९७,२१६ व शेड बांधणी कुशल कामासाठी नागपूर येथील संचालनालय कार्यालयाकडून रुपये १,५०,००० देण्यात येतात. तथापि, शेतकऱ्यांना प्रतिपूर्तीच्या रक्कमा देण्यात आल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना रेशीम तुती लागवडीच्या लाभाची प्रतिपूर्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (१३-१२-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

अकुशल रकमांची देयके E-FMS प्रणालीमधील काही तांत्रिक अडचणींमुळे रिजेक्ट झाली आहेत. तर कुशल रकमांची देयके प्रलंबित आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) अकुशल रकमांची देयके E-FMS प्रणालीद्वारे पुन्हा अदायगी करण्याबाबत, तसेच कुशल देयके अदा करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.